शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सातारा

दूरध्वनी ०२१६२- २३४८०७, फॅक्स -०२१६२-२३९४७२. ई-मेल - ssasatara1@rediffmail.com

---

# मान्यता/नुतनीकरण २०१९ ते २०२२ मान्यता आदेश

**नमुना दोन**

२६७२

जा.क्र.:- शिक्षण/प्राथ/प्रशा-१३/RTEमान्यता/STR /२०१९-२०२०

दिनांक- ०६/०३/२०२०

प्रति,

**३३.मुख्याध्यापक,**
**रयत इंग्लिश मिडीयम स्कूल सातारा ता जि सातारा**
**युडायस क्रमांक - २७३११०२७४०५**

**विषय- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याच्या नियम ११, पोट-नियम(४)अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

शाळेच्या मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती -**सातारा** कार्यालयाकडे सन २०१९ ते २०२२ पर्यंतच्या आरटीई मान्यतेच्या/नुतनीकरणासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी करून सदर शाळा नियमानुसार आरटीई अॅक्ट २००९ अन्वये भौतिक सुविधा पुर्ण करीत असलेने गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती - **सातारा** यांचेकडील दिनांक- **०६.०३.२०२०** नुसार आरटीई मान्यतेबाबतच्या शिफारशीसह स्वप्रतिज्ञापत्रास अधीन राहून

मी शिक्षणाधिकारी,(प्राथमिक) जि.प.सातारा. दिनाक- **०१/०४/२०१९** पासून ते दिनाक- **३१/०३/२०२२** पर्यंतच्या कालावधीसाठी इयत्ता- **१** ते इयत्ता-**७ विनाअनुदानित इंग्रजी** माध्यम शाळेकरीता **रयत इंग्लिश मिडीयम स्कूल सातारा ता जि सातारा** या शाळेस तात्पुरती आरटीई २००९ अंतर्गत मान्यतेस/नुतनीकरणास मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९(जोडपत्र एक)आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११(जोडपत्र दोन)मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

३. शाळा विनाअनुदानित असल्यास नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत,त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४. विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित शाळांसाठी परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र्य बँक खाते देईल.

५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये,याची सुनिश्चिती शाळा करील

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा,अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई च्या दहा निकषांची पुर्तता करीत असलेबाबत गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती **सातारा** यांचेकडुन स्व-प्रतित्रापत्र दिलेले आहे

**११** मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२ शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडागण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे

१४. शाळा कोणत्याही व्यक्तिच्या गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्य किंवा इतर कोणत्याही व्यक्तिच्या फायदयाकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

**१५.** शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविणेत यावी.

**१६.** तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक – **STR1027405** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.

**१७.** शिक्षण संचालक,/जिल्हा शिक्षणाधिकारी, वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण.देईल अशा सूचनांचे पालन करावे.

**१८.** संस्थेच्या नोदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

**टिप –** शाळेतील मुख्याध्यापकांनी सन २०१९ ते २०२२ पर्यंतच्या आरटीई मान्यता/नुतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी/प्रशासनधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओसी (दुय्यम)नस्ती/फाईल पृष्ठ क्रमांकासह आपल्याकडेच व्यवस्थित जपून ठेवावी.भविष्यात माहिती अधिकारीतील अर्ज कायदेशीर व नियमानुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(प्रभावती कोळेकर)**

**शिक्षणाधिकारी (प्राथ)**

**जिल्हा परिषद सातारा**

RAYAT ENGLISH MEDIUM SCHOOL

**Principal**

**Reyat English Medium School**

**Satara**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

सातारा जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ.)
21 FEB 2019
आवक क्र.
अधि. क.अधि. ...

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.१०५/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०६ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना-**

१. रयत शिक्षण संस्था, सातारा संचलित रयत इंग्लिश मिडिअम स्कूल, सदरबाजार, सातारा, जि.सातारा या शाळेस मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत रयत शिक्षण संस्था, सातारा संचलित रयत इंग्लिश मिडिअम स्कूल, सदरबाजार, सातारा, जि.सातारा या शाळेस (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ **अटी व शर्ती -**

(१) सदर संस्थेने २०,०००/- रूपयाचे नवीन चलन, एक लाख रूपयाचे अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, लगतच्या वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल, इ. १ ली ते ५ वी करिताचे अद्ययावत आरटीई नमुना-२ प्रमाणपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या बाबींची पूर्तता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(२) सदर शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९**मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

**ब)** व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन

निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढशाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सातारा जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ.)
२ १ FEB २०१९
आवक क्र.

०८.०२.२०१९
(रा.वि.कुडले)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जि.प. सातारा.
७. निवडनस्ती (एसएम-२)

RAYAT ENGLISH MEDIUM SCHOOL * SATARA *

Principal
Rayat English Medium School
Satara